# मिलिंदचे दिवस

## नरेन्द्र चपळगावकर

इंटर उत्तीर्ण झाल्यावर पुढील शिक्षण अमरावतीत चालू ठेवण्याचे काहीच प्रयोजन नव्हते. औरंगाबाद जवळ होते आणि तेथे दोन महाविद्यालये होती. शासकीय महाविद्यालयात काही मित्र पूर्वीपासून शिकत होते. गणेश नागेश थत्ते हे करड्या शिस्तीचे शिक्षक त्या महाविद्यालयाचे प्राचार्य होते. त्यांनी माझ्या वडिलांनाही शिकवलेले होते. औरंगाबादचे शासकीय महाविद्यालय तेव्हा किलेआर्क या जुनाट ऐतिहासिक इमारतीत भरत होते. त्या तुलनेने तीन-चार वर्षांपूर्वी डॉ. आंबेडकरांनी औरंगाबादेत स्थापन केलेल्या मिलिंद महाविद्यालयाची इमारत साधीच परंतु खूप मोठी होती. मोठमोठ्या वर्गखोल्या, खूप रुंद व्हरांडा, चहुबाजूंनी येणारी मोकळी हवा, आवारातले प्रशस्त उद्यान हे वातावरण कोणालाही आवडणारे होते. मिलिंदचे खरे आकर्षण होते तेथला शिक्षकवर्ग आणि सुसज्ज ग्रंथालय. मी शाळेत असतानाच या महाविद्यालयाचे काही प्राध्यापक आपल्या महाविद्यालयाची माहिती देण्यासाठी बीडला आले होते. म.भि.चिटणीस आणि प्रा. द.वा. जोग यांची आमच्या शाळेत व्याख्यानेही झाली होती. टापटीप पोशाखातल्या या प्राध्यापकांची छाप आम्हा विद्यार्थ्यांवरही पडली होती. डॉ. आंबेडकरांनी गुणवान आणि उत्साही प्राध्यापकांचा एक संच आपल्या महाविद्यालयात जमवला होता. प्राचार्य चिटणीस व श्री.म. पिंगेही मराठी शिकवत. थोडे नंतर भालचंद्र फडकेसुद्धा महाविद्यालयात रुजू झाले. म.ना. वानखेडे इंग्रजीला, अर्थशास्त्राला मूर्ती, इतिहासाला र.शं. गुप्ते तर राज्यशास्त्राला महाजन असे शिक्षक होते. विज्ञान विभागाचा प्राध्यापकवर्गही अतिशय चांगला होता. नरवणे, ठकार, शहारे अशी प्राध्यापक मंडळी त्या विभागात होती. प्राध्यापकांची निवड गुणवत्तेवरच करण्यावर डॉक्टरांचा कटाक्ष तर होताच, परंतु सर्वच जातीजमातीचे प्राध्यापक आपल्या संस्थेत असावेत असाही त्यांचा प्रयत्न असे. त्यांच्या या दृष्टिकोनाची एक गोष्ट चिटणीसांनी नंतर मला सांगितली. महाविद्यालयातील प्राध्यापकांत मराठवाड्यातले व त्यातही मराठा जमातीचे कोणी नव्हते. त्यावेळी पदव्युत्तर पदव्या संपादन केलेले लोकच मराठवाड्यात कमी होते. औरंगाबादेत वकिली करणारे व्यंकटराव जाधव यांनी एम.ए.ची पदवीही संपादन केली होती. त्यांची माहिती मिळताच डॉ. आंबेडकरांनी चिटणीसांना त्यांच्याकडे पाठवून मिलिंदमध्ये प्राध्यापक होण्याचे निमंत्रण दिले. परंतु जाधवांना प्राध्यापक होण्यात रस नव्हता.

मनात पूर्वीच ठरवल्याप्रमाणे मी मिलिंदमध्ये बी.ए.च्या वर्गात पंचावन्नच्या जून महिन्यात प्रवेश घेतला. मिलिंद महाविद्यालय औरंगाबाद शहराच्या कोटालगत बारापुल्ला दरवाज्याच्या बाहेर विस्तीर्ण जागेत होते. याच महाविद्यालयात माझा एक चुलतभाऊ राजा विज्ञान शाखेत शिकत होता. तो महाविद्यालयाजवळच कमानीला खेटून असलेल्या एका घरात पेईंग गेस्ट म्हणून राहत होता. मुन्नास्वामी मुंडले हे मूळ तेलगू भाषिक सार्वजनिक बांधकाम खात्यात खडी दाबण्याचा रोलर चालवीत. त्यांनी बांधलेल्या एका छोट्याशा पण टुमदार घरात दोन स्वतंत्र खोल्या होत्या. एका खोलीत राजा राहत होता, दुसरीत माझी सोय झाली. मुंडलेंच्या पत्नी अम्मा राजाला आणि मला जेवणही देत. घरचे जेवण आणि महाविद्यालयाच्या अगदी जवळ निवास ही फार मोठी सोय होती. मात्र या घराच्या जवळ मध्यमवर्गीय वस्तीच नव्हती. समोर होती औरंगाबाद मिल. त्यामुळे मिलचे कामगार आजूबाजूला रहात. काही अडचण नसे; मात्र गावात राहणाऱ्याकडे जसा मित्रमंडळीचा आणि नातेवाईकांचा राबता असतो तसा येथे अजीबात नव्हता. गावापासून दूर असलेल्या या खोलीवर कोण मित्र येणार?

आमच्या महाविद्यालयाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे अद्यावत असलेले ग्रंथालय. एवढे चांगले ग्रंथालय त्यावेळी मराठवाड्याच्या इतर कोणत्याही महाविद्यालयात नव्हते. स्वत: डॉ. आंबेडकर ग्रंथप्रेमी असल्यामुळे आपल्या शिक्षणसंस्थांची ग्रंथालये समृद्ध असावीत व प्राध्यापक आणि विद्यार्थी या दोघांनीही त्याचा भरपूर लाभ घ्यावा, असा त्यांचा कटाक्ष असे. के.द. वडजीकर आमचे ग्रंथपाल होते, ते विद्यार्थ्यांनाही अतिशय चांगली वागणूक देत. बहुतेक ग्रंथालयात नियमांना प्राधान्य असते. वडजीकर नियम बाजूला ठेवून विशेष वाचन करू इच्छिणारांना मदत करीत. काही वेळा नवे संदर्भग्रंथ सुचवीत. स्वत: आंबेडकर औरंगाबादला आले म्हणजे ग्रंथालयात

जाऊन नवी पुस्तके डोळ्याखालून घालत तसेच कोणत्या प्राध्यापकांनी कोणती पुस्तके वाचली आहेत हेही पाहत.

वर्ग सुरू झाले आणि हळूहळू मी रमत गेलो. महाविद्यालयाचे प्राचार्य होते मनोहर भिकाजी चिटणीस. चिटणीस हे एक कलाप्रेमी व रसिक व्यक्तिमत्व होते. डॉ. आंबेडकरांचा विश्वास आणि प्रेम संपादन केलेल्या चिटणीसांनी महाविद्यालयाची उभारणी आणि व्यवस्थापन यांच्या जबाबदारीला पूर्ण न्याय देतानाच आपले छंदही जोपासले होते. औरंगाबाद जवळच्या पितळखोऱ्यातल्या लेण्यांना ते अनेकदा भेटी देत. त्यांना शिकारीची आवड होती आणि ते उत्तम निसर्गचित्रेही काढत. एका स्नेहसंमेलनात भरवलेल्या प्रदर्शनात चिटणीसांची बरीच चित्रे होती. शिल्प व संगीत या कलातही त्यांना रस होता. चिटणीस स्वत: मराठी शिकवत. मराठी माझ्या विशेष आवडीचा विषय प्रथमपासूनच होता. इंदिरा संतांचा 'शेला' हा काव्यसंग्रह आणि 'प्रस्थान' हा वामन चोरघड्याचा कथासंग्रह आम्हाला चिटणीसांनी शिकविला. चिटणीसांची शिकविण्याची पद्धत इतरांपेक्षा वेगळीच होती. वेळापत्रकाची शिस्त त्यांना फारशी महत्त्वाची वाटत नसे. कविता वाचणे, अर्थ सांगणे, कथेचा सारांश सांगणे असल्या गोष्टीवर त्यांचा विश्वास नसे. मात्र लेखक, त्याचे लेखन आणि त्याचे वाङ्मयीन गुणदोष या सगळ्याची ओळख ते व्यवस्थित करून देत. त्यासाठी एखाददिवशी जादा तासही घेत. सलग दोन तास आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा एक तास अशा तीन तासांत चिटणीसांनी आम्हाला इंदिरा संतांच्या कवितेची ओळख करून दिली आणि 'शेला' शिकविणे संपले. त्यातल्या फक्त निवडक कवितांचा उल्लेख केला. त्यातील काही भाग वाचून दाखविला. परंतु अशा पद्धतीने शिकविले की इंदिराबाईंची सगळीच कविता आमच्या मनात जाऊन बसली. रुढ मराठी प्रेमकवितेपेक्षा इंदिराबाईंच्या कवितेचे वेगळेपण, पती सहवासाचे माधुर्य आणि त्याच्या आठवणी एखादी गृहिणी कवयित्री चांगल्यारीतीने कसे व्यक्त करू शकते हे चिटणीसांनी आम्हाला समजावून सांगितले. करंदीकर, बापट, पाडगावकर आम्ही वाचत होतोच. आता इंदिरा संतही त्या यादीत सामील झाल्या. चिटणीसांनी शिकवताना शब्दांचे किंवा ओळींचे अर्थ कधी सांगितले नाहीत, पण विशिष्ट कविता कशी वाचावी, तिचा मनात अर्थ कसा जागवावा हे आम्हाला शिकविले.

चोरघड्यांचा 'प्रस्थान' हा कथासंग्रह त्यातील हळुवार आणि काव्यमयतेकडे झुकणाऱ्या प्रेमभावनेमुळे मला त्यावेळी खूपच आवडे. आपला नवरा परगावी असताना त्याच्या प्रेमाची मनात सतत जागी असलेली भावना अधिक उजळण्यासाठी एका मित्राबरोबर फिरावयास गेलेली आणि त्याच्याशी मोकळेपणाने पण संयमितपणे ते व्यक्त करणारी 'घार'मधील चोरघड्यांची नायिका मला अजून लक्षात आहे. चोरघड्यांच्या कथन कौशल्याबरोबरच त्या कथेचे वेगळेपण चिटणीसांनी ज्या पद्धतीने उलगडले त्यामुळे ती कथा आम्हाला अधिक भावली.

'प्रस्थान' शिकत असतानाच एक थोडासा कडवट प्रसंग वर्गात घडला. समतेच्या विचाराचा आग्रह हा चिटणीसांचा महत्त्वाचा मनोधर्म होता. या पुस्तकातल्या एका कथेत गायत्रीमंत्राचा अनुवाद आहे. हा अनुवाद वाचल्यानंतर मूळ गायत्रीमंत्र म्हणून दाखवा असे पहिल्या बाकावर बसलेल्या आमच्या एका वर्गमित्राला चिटणीसांनी सांगितले. तो उभा राहिला; परंतु त्याने गायत्रीमंत्र म्हटला नाही. चिटणीस कडवटपणे म्हणाले, 'बरोबर आहे. वर्गात स्त्री- शूद्र बसलेले आहेत म्हणून तुम्ही गायत्रीमंत्र म्हणत नाही.' चिटणीसांच्या या उद्रेकाचा मला थोडा रागच आला. कदाचित त्या मित्राला गायत्रीमंत्र पाठ नसावा, पण चिटणीसांच्या मनात वेगळीच शंका आली होती. मी चटदिशी उभा राहिलो आणि मला पाठ असलेला गायत्रीमंत्र म्हणू लागलो. मी गायत्रीमंत्र म्हटल्यानंतर चिटणीस शांत झाले. त्यांनी मग संस्कृत मंत्राचा अनुवाद आणि त्याचा संदर्भ समजावून सांगितला आणि त्यांचे अध्यापन पुढे सुरू झाले. चिटणीस नुसतेच मराठीचे प्राध्यापक नव्हते तर आंबेडकरांचा सामाजिक समतेचा विचार ज्यांनी जाणीवपूर्वक स्वीकारला होता असे त्यांचे एक सहकारी होते.

मराठी शिकविणारे दुसरे प्राध्यापक म्हणजे डॉ. श्री.म. पिंगे. पिंगे प्रियोळकरांचे विद्यार्थी. ख्रिस्ती मराठी वाङ्मयाचे अभ्यासक. ते मुक्तेश्वराच्या महाभारताचे आदिपर्व शिकवीत. त्यांच्या बोलण्याची एक विशिष्ट पद्धत होती. बोलताना वाक्यातील कर्म वगळीत आणि वाक्य पूर्ण झाल्यावर विसरून राहिलेले कर्म नुसतेच उच्चारीत. त्यामुळे भलतेच विनोद निर्माण होत. त्यांच्या वर्गात मी बरेच दिवस बसलोच नाही. एके दिवशी त्यांनी प्राचार्यांकडे तक्रार केली. त्याकाळी किमान उपस्थितीचा नियम पाळला जाई. चिटणीसांनी मला बोलावून घेतले. माझ्या समक्षच पिंग्यांनी तक्रार सांगितली. 'यापुढे वर्गात गैरहजर राहिलास तर चालणार नाही', असे चिटणीसांनी मला सांगितले आणि पिंग्यांच्या हातातील उपस्थितीचे रजिस्टर घेऊन त्यात माझी गैरहजेरी खोडून तेथे तेथे हजेरी मांडली. मी तासाला गैरहजर असेन तर ग्रंथालयात वाचत बसलेला असतो हे चिटणीसांना माहीत होते.

बी.ए. मराठीच्या वर्गात पंधरा-वीस मुलेच असत. बहुतेकांचा कौटुंबिक परिचयच होता. सुधीर रसाळांची बहीण लीला आणि पुरुषोत्तम हौजवालांची बहीण गंगा आमच्याच वर्गात होत्या. अतिशय साधी राहणी असलेली लीला महाविद्यालयात शिकणारी विद्यार्थिनी आहे असे आजच्या काळात कोणालाही पटले नसते. तिचे वडील न.मा. कुलकर्णी सरस्वती भुवनमध्ये

शिक्षक होते. तुटपुंज्या पगारात मोठे कुटुंब चालवणाऱ्या न.मां.ची प्राधान्ये लक्षणीय होती. लीलाजवळ सर्व पुस्तके असत; मात्र पायात चप्पल नसे. चप्पल नसले तरी चालू शकेल; पण पुस्तके विकत घेतलीच पाहिजेत असे त्यांना वाटे. लहान गावात सर्वांचाच एकमेकांशी कौटुंबिक संबंध असल्यामुळे वर्गातले वातावरण एखाद्या घराच्या ओसरीसारखे असे.

मिलिंद महाविद्यालय हे त्यावेळी सर्व सांस्कृतिक उपक्रमांचे शहरातले मोठे केंद्र झाले होते. गावात कोणीही मोठा पुढारी आला तर त्याला आमच्या महाविद्यालयात बोलावले जाई. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरत आली असताना शंकरराव देव एकदा आले. महाविद्यालयाच्या तळमजल्यावर उपहारगृहजवळ एक मोठा हॉल होता. त्या हॉलमध्ये त्यावेळी महाविद्यालयाचे कार्यक्रम होत. देव संयुक्त महाराष्ट्राच्या प्रश्नाबद्दल बोलणार हे उघड होते. प्रारंभी विद्यार्थिनींनी 'बहु असोत सुंदर संपन्न की महा, प्रिय आमचा एक महाराष्ट्र देश हा' हे श्रीपाद कृष्णांचे महाराष्ट्रगीत म्हटले. महाराष्ट्रगीत संपल्याबरोबर देव म्हणाले, महाराष्ट्राचे प्रेम हवेच आहे; परंतु महाराष्ट्र प्रेमाच्या वर्तुळाबाहेर भारताच्या प्रेमाचे एक मोठे वर्तुळ आपल्या मनात हवे. भारताचे गीतही म्हणा. आम्ही त्यांना सांगितले की भारताचा गौरव असलेले राष्ट्रगीत सभेच्या शेवटी म्हटले जाणारच आहे. शंकररावांचे समाधान झाले आणि त्यांनी भाषणाला सुरुवात केली.

गावातल्याही प्रमुख नेत्यांना काही निमित्ताने महाविद्यालयात बोलावण्यात येई. एकदा गोविंदभाई श्रॉफ यांना व्याख्यानासाठी बोलावण्यात आले. कारण काय झाले होते माहीत नाही पण भाई उभे राहिल्यानंतर एकदम भावनावश झाले. त्यांच्या तोंडून एकही शब्द फुटेना. गहिवरलेल्या अवस्थेत ते सुमारे दहा मिनिटे फक्त उभे होते. भरलेल्या सभागृहातली मुले आणि प्राध्यापक फक्त स्तब्ध बसलेले होते. थोडाही आवाज कोणीही केला नाही. एखादी सभा चित्रासारखी तटस्थ असण्याचा तो अनोखा अनुभव होता. दहा मिनिटानंतर गोविंदभाई खाली बसले. अध्यक्षस्थानी असलेल्या प्राचार्य चिटणीसांनी स्वत:च सुमारे अर्धा तास भाषण केले आणि सभा संपली.

चिटणीस आपल्या विद्यार्थ्यांना नेहमी उत्तेजन देत. कार्यक्रमाचे संचलन त्यांना करावयास लावत, आभारही त्यांनाच मानावयास लावत. त्यामुळे विद्यार्थ्यांना धीटपणा तर येईच; पण सभेतील रिवाजांची सवय होई. एकदा गोविंद बल्लाळ देवलांच्या शारदा नाटकातले काही प्रवेश महाविद्यालयातल्या मुलींनी करून दाखविले. कार्यक्रमाचा समारोप करण्यास मला सांगितले होते. 'श्रीमंत पतीची राणी मग थाट काय तो पुसता' अशी त्या प्रवेशातल्या गाणी आणि वल्लरी आणि तिच्या मैत्रिणी यांचे संवाद यांचा उल्लेख करून मी 'तुमच्या माझ्या घरात जे घडू शकते आणि ज्या भाषेत ते व्यक्त होते तसेच प्रसंग आणि तशीच घरगुती भाषा देवलांनी वापरली आहे' असे भाषणात म्हणालो. समारंभ संपल्यावर चिटणीस 'देवलांच्या नाटकाचे महत्त्वाचे वैशिष्ट तू चांगले सांगितलेस' असे मला म्हणाले. चिटणीसांच्या या उद्गारामुळे वाङ्मयातले आपल्याला थोडे कळू शकते असा आत्मविश्वास मला आला.

याच काळात मराठवाड्याला स्वतंत्र विद्यापीठ हवे अशी मागणी जोर धरू लागली. हैदराबादचे विभाजन होणार हे लक्षात आल्याबरोबर मराठवाड्यातील लोकप्रतिनिधींनी हैदराबाद राज्यानेच मराठवाड्याला वेगळे विद्यापीठ द्यावे, असा प्रयत्न सुरू केला होता. वेगळे विद्यापीठ होण्याला चिटणीसांचाही अर्थातच पाठिंबा होता. एके दिवशी या मागणीसाठी औरंगाबादमधील सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विद्यापीठदिन सादर केला. हरताळामुळे सर्व महाविद्यालये बंद पडली. मुले मिरवणुकीने मिलिंदच्या मैदानावर आली व तेथे विद्यार्थ्यांची सभा झाली. चिटणीस सभेला हजर होते. परंतु सभेचे अध्यक्षपद मात्र मी स्वीकारावे असे चिटणीसांनी सांगितले व ते श्रोत्यात जाऊन बसले. मी अध्यक्ष होऊन सभा चालविली.

डॉ. आंबेडकर त्या काळात राज्यसभेचे सभासद होते. त्यांचा मुक्काम प्रामुख्याने दिल्लीतच असे. औरंगाबादला ते आले म्हणजे महाविद्यालयात फेरी असेच. काठी टेकीत महाविद्यालयाच्या वऱ्हांड्यातून जाणाऱ्या बाबासाहेबांचे दृश्य त्यावेळच्या विद्यार्थ्यांच्या मनात अजूनही ताजे असेल. पंचावन्नचा ऑक्टोबर- नोव्हेंबर महिना असावा. बाबासाहेबांचे भाषण होणार असे जाहीर झाले. महाविद्यालयाच्या इमारतीने तीन बाजूने वेढलेल्या एका मोकळ्या जागेत विद्यार्थी दाटीवाटीने बसले. प्राध्यापक व गावातले काही निमंत्रितही हजर होते. अगोदर करवून घेतलेला महाराष्ट्राचे तीन भाग पाडलेला एक नकाशा एका फलकावर चिकटवण्यात आला होता. जवळजवळ तास-सव्वातास बाबासाहेब बोलत होते. मराठी भाषिकांचे एकच राज्य न करता त्यांची तीन राज्ये करावीत अशी आपली योजना बाबासाहेबांनी त्या भाषणात नकाशाचे साह्य घेत समजावून सांगितली. बाबासाहेब आडवळणाने काही बोलणारे नव्हते. त्यांचे प्रतिपादन स्पष्ट व रोखठोक असे. मराठी भाषिकांचे एकच राज्य बनले तर त्यावर एकाच जातीचे वर्चस्व प्रस्थापित होईल. जर विदर्भाचे एक, मराठवाडा व खानदेशाचे एक आणि उर्वरित महाराष्ट्राचे एक अशी तीन राज्ये अस्तित्व आली तर काही संख्येने लहान पण सामाजिक बलाने लक्षणीय असलेल्या जाती आपल्या राज्यात प्रभाव टाकू शकतील असा त्यांचा युक्तिवाद होता.

महाविद्यालयात मोठ्या संख्येने दलित विद्यार्थी असले

तरी जवळजवळ तेवढेच दलितेतरही होते. दलित विद्यार्थ्यांत मराठवाड्यापेक्षा विदर्भातून आलेल्या मुलांचे प्रमाण अधिक असावे. गाव सोडून औरंगाबादेत येऊन शिक्षण घेण्यासाठी लागणारा किमान आर्थिक क्षमताही मराठवाड्यातल्या दलितात नव्हती; शिवाय मॅट्रिक झालेली मुलेही कमी असत. बाबासाहेबांविषयी सर्वच विद्यार्थ्यांच्या मनात आदर होता. खेड्यापाड्यातून आलेल्या दलित मुलांच्या चेहऱ्यावर समोर बाबासाहेब दिसताच जो भक्तिभाव दाटून येई तो मन हेलावणारा असे. बाबासाहेबांचा मुक्काम तीन-चार दिवस असेल तर आजूबाजूच्या गावातून लोक दर्शनला येत. बाबासाहेबांना मात्र कोणी पाया पडलेले फारसे आवडत नसे.

पोलिस कारवाई होऊन हैदराबाद संस्थान स्वतंत्र झाले त्या सुमारास औरंगाबादेत एक छोटेसे वाङ्मयीन वर्तुळ होते. ज.प. मुळे, न.मा. कुलकर्णी, वसंतराव धारवाडकर, आकाशवाणीत बदलून आलेले वा.रा. कांत, नीळकंठ पोखारे अशी मंडळी त्यात होती. 'प्रतिभा' नावाचे एक मासिकही त्यांनी दोन-तीन वर्षे चालवले. कांतांचे दोन कवितासंग्रही याच मंडळींनी प्रकाशित केले. पण हे सगळे पदरमोड करून करावे लागे. या बुजूर्गांपेक्षा वयाने लहान असलेले काही तरुण होते. त्यांनी प्रथम 'कुमार साहित्य मंडळ' व नंतर 'युवक साहित्य मंडळ' चालवले. आपल्या गुणवत्तेला योग्य स्थान व उत्तेजन मिळत नाही अशी सर्वच क्षेत्रातल्या तरुणांची भावना असते तशीच यांचीही होती.

मी औरंगाबादेत आलो त्यावेळी जुन्या मंडळींपैकी औरंगाबादेतील न.मा.- कांतांचा परिवार कार्यरत नव्हता. कांत बदलून मुंबईला गेले होते. न.मां.नी या क्षेत्रातून निवृत्ती घेतली होती. जुन्या कवींपैकी बा.ग. हरसूलकर नासगल्लीत राहत होते; पण नवे फारसे लिहीत नव्हते. हौजवाला-महाजन हीच वाङ्मय क्षेत्रातील कार्यकर्ती मंडळी होती. त्र्यंबक धावणी मोहल्ल्यात रहात असे. जवळच असलेल्या खाराकुँव्यात राहणाऱ्या पुरुषोत्तम हौजवालाच्या घरी त्या 'युवक साहित्य मंडळा'चे कार्यालय म्हणजे एक छोटीशी पाटी असे. त्र्यंबकचे एक नाटक आणि हौजवालाचा एक कथासंग्रह छापला गेला होता. मराठवाड्यात तेव्हा प्रसिद्धीची साधने फारशी अस्तित्वात नव्हती, आपले लेखन छापले जाणे लेखकासाठी अप्रूप होते. १९५२-५३ च्या सुमाराला औरंगाबादेतील काही तरुण कथालेखकांनी आपल्या कथा पुस्तकाच्या आकारातील कागदावर हाताने लिहून घेतल्या आणि बायडिंग करून घेऊन त्या हस्तलिखीत कथासंग्रहाचा प्रकाशन समारंभही घडवून आणला होता.

महाजन आणि हौजवाला, दोघांच्या बोलण्यात चंद्रकांत भालेराव आणि सुधीर रसाळ या दोघांचे उल्लेख येत. चंद्रकांत एलएल.बी.साठी तर सुधीर मराठीत एम.ए. होण्यासाठी हैदराबादला शिकत होते. उन्हाळ्याच्या सुटीत ते दोघे आल्यावर त्यांची ओळख झाली. सुधीर हा न.मा. कुलकर्णींचा मुलगा. पैठणगेटजवळ नाथप्रसाद दीक्षितांच्या स्टुडिओवर त्यांचे घर होते. सुधीरला घरचे लोक बापू म्हणत, तसेच मीही म्हणू लागलो. बापू स्वत: तेव्हा काही लिहीत नसला तरी गंभीरपणे वाचन करी. तो भेटला म्हणजे त्याने वाचलेल्या नव्या पुस्तकांबद्दल बोलत असे. तो, मी व चंद्रकांत बराच वेळ एकत्र असू. कॉलेज संपले की खोलीवर वह्या-पुस्तके फेकून मी लगेच बाहेर पडत असे. खोलीवर खरे म्हणजे करमायचे नाही. दोन-तीन किलोमीटर चालत गावात यायचे. चंद्रकांतला बरोबर घेऊन बापूकडे जायचे. त्याला बाहेर काढून मग भटकंती सुरू होई.

औरंगाबाद तेव्हा खरोखरच भटकण्यासारखे गाव होते. रस्ते अतिक्रमणाने आणि गर्दीने बकाल झालेले नव्हते. रस्त्यावर वाहनांची गर्दी नव्हती. रमतगमत पायी चालता येत असे. आज क्रांतीचौक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या चौकाला 'काळा चबुतरा' म्हणत. चौकाच्या एका बाजूला अठराशे सत्तावन साली दोन बंडखोर शिपायांना एका चबुतऱ्यावर फाशी देण्यात आले होते, त्याला काळा चबुतरा म्हणत. तो चबुतरा तेव्हा शाबूत होता. अतिक्रमणकर्त्यांनी उद्ध्वस्त केला नव्हता. चौकाच्या चारही कोपऱ्यात कठडे बांधले होते. त्यावर फिरायला येणारे थोडावेळ टेकू शकत. या चौकापासून रेल्वेस्टेशनपर्यंत रस्त्याच्या दुतर्फा गुलमोहाराची आणि थोडी बुचाची झाडे होती. गुलमोहर बहरला व रस्त्याच्या दोन्ही बाजूला लालभडक सलग पट्टे दिसू लागले म्हणजे मधून जाणाऱ्या सिमेंटच्या रस्त्यावर फिरताना फार छान वाटे.

गुलमंडीवर कामाक्षी भुवन नावाचे एक हॉटेल आमच्या आवडीचे होते. त्याचे एक महत्त्वाचे कारण म्हणजे कामाक्षीमध्ये पाठीमागच्या बाजूला खूप मोठी जागा होती. वर वेल चढवलेल्या कामट्यांच्या जाळीचे छप्पर असलेल्या या जागेत निवांतपणे बसता येत असे. चार आण्याला स्पेशल आणि दोन आण्याला चालू चहा मिळत असे. स्पेशल हा खूप साखर असलेला घट्ट चहा असे. तो आम्हाला मनोमन आवडतही नव्हता आणि चालू चहाला चवच नव्हती. त्यामुळे एक कप चालू आणि स्पेशल एकत्र करून मिक्स नावाने ओळखला जाणारा चहा आम्ही घेत असून. पैसेही कमी लागत आणि ती ही आमच्यासाठी महत्त्वाची गोष्ट होती.

बहुतेकवेळा आमच्या गप्पा रात्री आठ- नऊ वाजेपर्यंत चालत. नाइलाजाने आवरते घेऊन मी परत खोलीकडे जायला निघे. कधी कधी बापू आणि चंद्रकांत अर्ध्या रस्त्यापर्यंत मला सोडायला येत. परतीचा हा रात्रीचा प्रवास निर्वेध नव्हता.

रात्री नऊ वाजताही रस्त्यावर अगदीच तुरळक रहदारी असे. मध्ये एक किलोमीटर वस्तीच नव्हती. होते ते खडकेश्वराचे देऊळ आणि चितळ्यांचे छोटेसे घर. रस्त्यात मोकाट कुत्रीही त्रास देत. मला खोलीवर पोहोचायला कधीकधी रात्रीचे दहा-अकराही वाजत. कित्येकवेळा अम्मा जेवणासाठी माझी वाट पहात बसलेल्या असत. तेव्हापुरता मी खजील होई, पण लवकर परत येणे जमतच नसे.

वर्ष संपल्यावर सुटीत महिनाभर मी बीडला घरी जाऊन आलो. बापू रसाळ हैदराबादला परत गेला होता. चंद्रकांत हैदराबादला परत न जाता औरंगाबादेतच शिक्षक झाला होता. महाविद्यालयाचे वर्ग सुरू झाले. यंदा एका नवीनच उद्योगात मी रमून गेलो. औरंगाबादला गणेशोत्सव धूमधडाक्याने होऊ लागला होता. मेळ्यांची तर जुनी परंपरा होती. 'सुवर्णकार गणेश मंडळ' या नावाच्या एका मेळ्याच्या संचालकांनी चंद्रकांत आणि मला मेळ्यासाठी गाणी लिहिण्याची विनंती केली. संयुक्त महाराष्ट्राची चळवळ ऐन भरात होती. या संधीचा उपयोग संयुक्त महाराष्ट्राच्या प्रचारासाठी करून घेता येईल असे आम्हाला वाटले आणि आम्ही ते निमंत्रण स्वीकारले. आम्हाला गाण्याच्या विषयातच रस असला तरी मेळ्याच्या संचालक सराफ मंडळींचा गाणे जोरदार असले पाहिजे एवढाच आग्रह होता. आम्ही गाणी लिहिली आणि ती मेळ्यातल्या मुलांनी गायली. मेळ्यांचे कार्यक्रम रस्त्यात किंवा एखाद्या चौकात होत. दोन-चार हजार लोक सहज जमत. एवढा जनसंमर्द आपले कवित्व ऐकतो आहे ही भावना सुखावणारी असे. मात्र खरे म्हणजे वाद्यांच्या गदारोळातून आमचे शब्द अधूनमधूनच श्रोत्यांपर्यंत पोहचू शकत. मेळ्यातील गाण्याला तत्कालीन लोकप्रिय चित्रपटांच्या गीतांच्या चाली असल्यामुळे लोकांच्या मनात मूळ गीतच जागे होई. आमच्या प्रतिपादनात त्यांना फारसा रस नसे. आम्ही मात्र संयुक्त महाराष्ट्राचा जोरदार प्रचार आमच्यामुळे होत असल्याच्या कल्पनेत रमलेले असू. या मेळ्यासाठी मी लिहिलेल्या एका पोवाड्यातील काही ओळी माझ्या अजून लक्षात आहेत. औरंगाबादचे उत्तम चाललेले नभोवाणी केंद्र बंद करून पुण्यास नेण्यात आले होते. तो राग मनात ठसठसत होता.

'नभोवाणी केंद्र गेलं, शहराचं नाक गेलं ।
काय केलं तेव्हा आमच्या मंत्र्यांनी ?
विमानात धावपळ, शिष्टमंडळाचा घोळ,
तक्रारी साऱ्या यांच्या बहिऱ्या कानी'

गाणी लिहायला बसलो म्हणजे आमचा फार थाट असे. एका मोठ्या स्वतंत्र खोलीत आम्ही दोघे गीतकार, एका बाजूला पेटी व तबलावादक एखाद्या चित्रपट गीताची धून वाजवण्यासाठी. मेळ्याचे संचालक आमच्यापासून थोडे अंतर राखून अदबीने बसलेले. थोड्याथोड्या वेळाने चहा हवा का, खायला मागवू का अशी विचारणा होई. एकदा मात्र एका पेटीवादकाने फारच पिडले. आम्हाला उशीर झाला म्हणून खोल्यावर परत न जाता मी आणि चंद्रकांत तेथेच झोपलो होतो. पेटीवादकाला एक गाणे बसवण्याची हुक्की आली आणि त्याने सराव सुरू केला. गाणे होते-

'बचके बलम कहाँ जाओगे
हमे तुम पिछेपिछे पाओगे'

या गाण्याने आमचा पहाटेपर्यंत पिच्छा सोडला नाही. पेटीवादक रात्रीच काम असलेल्यापैकी होता. पण आम्हाला दिवसा कामे असत. शेवटी चंद्रकांतने रागावून त्याला पेटीसह हाकलून दिल्यावर आम्हाला तास-दोन तास झोप मिळू शकली.

गणेशोत्सवातल्या मेळ्यात समाजातल्या सर्व वर्गातले लोक वेगवेगळ्या भूमिकेत भाग घेत. कोणी आश्रयदाते तर कोणी कार्यकर्ते. त्यांच्यासाठी तो धुंदीचा काळ असे. अगदी छोट्या माणसाच्या जीवनातही अल्पकाळ प्रसिद्धीच्या झोतात येण्याची ती संधी असे. उरलेल्या वर्षभरात या भारलेल्या दिवसाच्या गोष्टी मोठ्या चवीने सांगितल्या जात.

राज्यपुनर्रचना झाली आणि मराठवाडा मुंबई राज्यात सामील झाला. त्याच्या थोडे अगोदर मराठवाडा साहित्य परिषद व 'मराठवाडा' वृत्तपत्र यांची कार्यालये हैदराबादेतून औरंगाबादेत येणार होती. औरंगाबाद शहरातले वाङ्मयीन कार्यक्रम मसापच्या नगर शाखेच्या पुढाकाराने होणार होते. या नगर शाखेच्या निवडणुकीसाठी त्र्यंबक महाजनांनी मोठी सभासद नोंदणी केली. त्याच्या कायदेशीरपणाबद्दल वादही झाले. नंतर निवडणुकही झाली. म.भि. चिटणीस अध्यक्ष व पुरुषोत्तम हौजवाल चिटणीस झाले. हैदराबादहून येणारी बुजूर्ग मंडळी आपल्याला कसे वागवणार ही शंका आम्हा काही मित्रांच्या मनात प्रथम होती. हळूहळू हा दुरावा निवळत गेला. 'मराठवाडा'चे संपादक अनंत भालेराव एकदा अचानक गुलमंडीवरच भेटले. त्यांनी परिषदेत काम करण्याचे निमंत्रणच दिले. साहित्य परिषदेत एखादा गट वगैरे नाही, काम करू इच्छिणाऱ्या सर्वांचे स्वागत आहे हे लक्षात आले. अनंतरावाचे नितळ, पारदर्शक व्यक्तिमत्त्व व आजकाल अभावानेच आढळणारी सार्वजनिक संस्थेबद्दलची निरपेक्ष वत्सलता यामुळे मी आकर्षित झालो. मी कधी चंद्रकांतबरोबर कधी एकटा तेव्हा सराफ्यात असलेल्या 'मराठवाडा' कार्यालयात जाऊ लागलो.

आपल्या महाविद्यालयाच्या स्नेहसंमेलनात एक मराठी नाटक बसवण्याची कल्पना त्यावर्षी निघाली. आर्टस् सर्कलच्या वतीने महाविद्यालयाच्या प्राध्यापकवर्गाने 'ज्युलिअस सीझर'चा एक देखणा प्रयोग केला होता. अमरावतीला 'मर्चंट ऑफ

व्हेनिस'चा एक प्रवेश आम्ही विद्यार्थ्यांनी केला होता. त्यात शायलॉकची भूमिका मी केली होती. नाटकात पुन: काम करण्याची इच्छा होतीच, आता तो योग येण्याची शक्यता होती. आम्हाला नाटक करण्यात पहिली अडचण स्त्री पात्राची होती. नाटकात काम करायला विद्यार्थिनी तयार होणे अवघड होते. शेवटी एखादे स्त्रीपात्रविरहित किंवा ज्यातील छोटी भूमिका असलेले स्त्रीपात्र वगळून रंगावृत्ती करता येईल असे नाटक हुडकावे लागणार होते. दत्ता आयरे यांचे 'जावई पाहिजे' किंवा अशाच काही नावाचे नाटक बसवावयाचे ठरले. त्यात दोनच प्रमुख भूमिका होत्या. त्यातली एक वसंत राखे या वर्गमित्राने व दुसरी मी केली. रंगभूमीवर हवे असलेले नेपथ्य व माझ्या खोलीतले नेहमीचे दृश्य यात काहीच फरक नव्हता. त्यामुळे माझी खोली आवरून सामान आणले व रंगमंचावर ते पुन: तसेच लावले. हे नाटक मुलांना आवडणाऱ्या विषयावर असल्यामुळे व प्रयोग नेटका झाल्यामुळे प्रेक्षकांनी उचलून धरले.

यावर्षी एक-दोन वेळा बाबासाहेब औरंगाबादला आले. पण त्यांची प्रकृती चांगली नव्हती. पूर्वी ते छावणीतल्या कुकरी हाऊसमध्ये उतरत. आता त्यांची व्यवस्था आमच्या महाविद्यालयातच वरच्या मजल्यावरील प्राचार्यांच्या खोलीशेजारच्या एका प्रशस्त हॉलमध्ये करण्यात येई. बाबासाहेबांना जिना चढायला त्रास होत असल्यामुळे एक लाकडी डोली तयार करवून घेण्यात आली होती. त्यावर बसवून बाबासाहेबांना वरच्या मजल्यावर नेण्याआणण्यात येई. प्राचार्य चिटणीसांनी 'युगयात्रा' नावाचे एक नाटक लिहिले होते. त्या नाटकाचा प्रयोग बाबासाहेबांनी आजारीपणातच पाहिला. दसऱ्याच्या दिवशी नागपूरला बाबासाहेबांनी हजारो अनुयायांसह बौद्धधर्म स्वीकारला. प्राचार्य चिटणीस आणि अनेक विद्यार्थी त्यावेळी नागपूरला गेले होते. पुढे त्यांची प्रकृती अधिक बिघडली आणि ६ डिसेंबरला त्यांचे निर्वाण झाल्याची बातमी आली. मिळेल त्या वाहनाने विद्यार्थी व प्राध्यापक मुंबईकडे रवाना झाले. दु:खाच्या आघाताने सर्वांनाच हादरा बसला होता. दलित मुले तर उन्मळूनच गेली होती.

जानेवारी संपत आला तेव्हा अभ्यासाला प्रारंभ करणे भागच पडले. खेड्यात शिक्षकाची नोकरी करता करता बहि:शाल विद्यार्थी म्हणून शिक्षण चालू ठेवलेला माझा बीडचा जुना मित्र भगवानदास वर्माही बी.ए.ला बसणार होता. तो रजा घेऊन अभ्यासासाठी औरंगाबादला माझ्या खोलीवर आला. उकाडा प्रचंड होता. वऱ्हांड्यात एक भलामोठा बल्ब लावून घरासमोरच्या सिमेंट रोडवर आम्ही रात्री ११ नंतर अभ्यास करीत असू. बाळकृष्ण रोंगे नावाचे एक ज्येष्ठ विद्यार्थीही बी.ए.ला बसणार होते. तेही माझ्या खोलीवर येऊ दाखल झाले. मी आणि वर्मा रात्रभर अभ्यास करून काही टिपणे काढत असू. त्यावेळी झोपलेले रोंगे पहाटे उठून कामाक्षीभुवनमध्ये जाऊन इडलीसांबर घेऊन येत. तिघांचेही खाणे झाले म्हणजे मी व वर्माने झोपायचे व रोंग्यांनी आमची टिपणे वाचत अभ्यास करायचा असा क्रम असे. महिनाभर असा अभ्यास झाल्यावर परीक्षा दिली. पेपर बरे गेले होते. आतापर्यंत परीक्षेच्या अगोदर पंधरा दिवस अभ्यास करत पास होत गेलो होतो. आता तर चांगला महिनाभर अभ्यास केला होता. धक्का देणाऱ्या निकालाची तेव्हा कल्पना नव्हती.

थोड्याच दिवसात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन औरंगाबादेत भरणार होते. त्याला हजर राहूनच नंतर बीडला जायचे मी ठरवले होते. औरंगाबादचे अनंत काणेकरांच्या अध्यक्षतेखालचे हे साहित्य संमेलन मी पाहिलेले पहिलेच संमेलन. संमेलनाच्या आयोजनात किंवा त्यातील कार्यक्रमात माझा, बापू किंवा चंद्रकांतचा काही सहभाग नसल्यामुळे मुक्तपणे उत्साही प्रेक्षक म्हणून या संमेलनाचा आनंद आम्ही घेतला. सरस्वतीभुवनच्या मैदानापैकी दोन-तीन हजार प्रेक्षक बसू शकतील एवढ्याच भागाला तीन बाजूने कनात लावली होती. छत फक्त व्यासपीठावरच होते. पूर्ण आणि भव्य मंडप घालण्याची तेव्हा पद्धत नव्हती व तेवढे पैसेही स्वागतमंडळाजवळ नसत. संमेलन मे महिन्यात असल्यामुळे मंडपाची गरजच नव्हती. सायंकाळी पाचच्या सुमाराला उद्घाटनसत्र सुरू झाले. मराठी साहित्य व साहित्यसंस्था यात भक्तिभावाने काम केलेले रावसाहेब र.लु. जोशी उद्घाटक होते. स्वागताध्यक्ष देवीसिंह चौहान राज्याच्या मंत्रिमंडळात मंत्री होते. त्यांनी द्विभाषिकाचा पुरस्कार करण्याचे कर्तव्य केले आणि प्रेक्षकांनी त्या विधानाचा जोरदार निषेध केला. व्यासपीठावर गर्दी तर अजिबात नव्हती. काही वेळा एकटे काणेकरच तेथे बसलेले असत. काणेकरांचे भाषण लोकांनी अतिशय शांतपणे ऐकले. ते संपले तेव्हा रात्रीचे दहा वाजत आले होते.

साहित्य संमेलनाला आजच्यासारखी गर्दी नसे. सुमारे दोन हजार लोक फक्त हजर असतील. मात्र समकालीन प्रमुख लेखकांची उपस्थिती चांगली होती. व्यवस्था साधी असे. प्रतिनिधींच्या निवासाची सोय शाळेतच केलेली होती. परिसंवाद व कविसंमेलन व्यासपीठाच्या मागेच असलेल्या शाळेच्या सभागृहात झाले. खुल्या अधिवेशनात मांडला जाणारा संयुक्त महाराष्ट्राचा ठराव हे संमेलनाचे मुख्य आकर्षण होते. या ठरावावर दत्तोपंत पोतदार, काकासाहेब गाडगीळ आणि नरहर कुरुंदकर यांची भाषणे झाली. सर्वांचीच भाषणे चांगली झाली, पण काकासाहेबांचे भाषण वक्तृत्व केलेचा एक अजोड नमुना होते. त्यांच्या पक्षानेच अस्तित्वात आणलेल्या द्विभाषिकाचा त्यांना उघडपणे निषेध करता येत नव्हता; त्याचबरोबर मी

संयुक्त महाराष्ट्रवादीच आहे व तो आणण्यासाठी मीही प्रयत्नशील आहे हे समोरच्या श्रोत्यांना पटवण्याचाही त्यांचा प्रयत्न होता. श्रोत्यांना काकांच्याबद्दल आदर असला तरी त्यांची सध्याची राजकीय भूमिका लोकांना अमान्य होती. अशा प्रतिकूल परिस्थितीत काकासाहेब बोलत होते. या भाषणात त्यांनी केलेला शमीच्या झाडावर ठेवलेल्या शस्त्रांचा (सध्या लढा स्थगित ठेवला असला तरी तो पुन्हा आम्ही सुरू करणार आहोत हे सांगणारा) उल्लेख पुढे महाराष्ट्रभर गाजला. या लढ्यात आपल्याला टीकेचे लक्ष्य केले जात आहे याबद्दलची तक्रार त्यांनी एका उर्दू काव्यपंक्तीच्या आधारे व्यक्त केली होती.

"हम आह भी भरते है तो होते है बदनाम
वो कत्ल भी करते है तो चर्चा नही होता"

काकासाहेबांच्या त्या भाषणासारखे भाषण आज ऐकायला मिळणे अवघड आहे. जेव्हा समाज उदार असतो, लोकप्रिय भूमिकेपेक्षाही वेगळी भूमिका असणारांचे म्हणणेही शांतपणे ऐकून घेतो तेव्हाच असा संवाद होऊ शकतो. समाज अनुदार झाला म्हणजे शब्दांची लक्षणा आणि व्यंजनाशक्ती गळून पडते आणि वक्तृत्वाच्या विविध छटांना महत्त्वच उरत नाही.

रात्री गिरजादेवींचे गाणे झाले. दोन दिवस खूपच दगदग झाली होती. अनेकांना भेटण्याची संधीही आम्ही घेतली होती. गाणे ऐकता ऐकता थकव्यामुळे पहाटे केव्हातरी झोप अनावर झाली. तेथेच आम्ही तिघे मित्र ताडपत्रीवरच झोपून गेलो. जाग आली तेव्हा ऊन खूपच तापले होते. संमेलन संपले होते.

---

न्या. नरेन्द्र चपळगावकर,
१३ जयनगर, दशमेशनगरजवळ,
औरंगाबाद - ४३१ ००५
दूरध्वनी (०२४०) २३३११६६